# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ४५९ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक २८/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

## फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

भंडारा:— जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक २५/०८/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत काकेपार येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले त्यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक. वर्मा सोबत ४ कर्म यांनी जनतेस मार्गदर्शन केले. व्हॉट्सअॅप, फेसबुक, अफवावर विश्वास ठेवु नये. बॅकींग एटीएम विषयी मार्गदर्शन तंटामुक्तीच्या माध्यमातुन जास्तीत जास्त तंटे मिटवावे. अंधश्रध्दा, जादुटोना, याविषयावर मार्गदर्शन केले. घरफोडी, चोरी, होणार नाही याकरीता ग्रामसुरक्षा दलाने गस्त घालावी याबाबत गावकऱ्यांना सुचना देण्यात आल्या. यावेळी १०० स्त्री १२५ पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन आंधळगांव अंतर्गत तारगाव येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक सोनटक्के व ४ कर्मचा—यांनी महिला विषयक कायदे, बाल लैगिंक कायदे, सायबर क्राईम बाबत अफवावर विश्वास ठेवु नका, आगामी येणारे सण उत्सव बाबत शांतता ठेवावी याबाबत जनजागृती केली. त्यावेळी ८० स्त्री, ९० पुरूष उपस्थित होते. पोलीस स्टेशन दिघोरी अंतर्गत मुरमाडी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सहायक पोलीस निरीखक गांवडे व ३ कर्म उपस्थित होते. गावात घरफोडी, चोरी, होवु नये याकरीता ग्रामसुरक्षा दलाने रात्र गस्त करावी. वाहतुक नियमांचे पालन करावे. धार्मीक स्थळे, पुतळे, मंदीर, मज्जीद, बौध्दविहार यांची सुरक्षा व जवाबदारी बाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत मांडगी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक झोटींग व ३ कर्मचाऱ्यांनी गावातील जनतेला अवैद्य धंदे सुरु असल्यास पोस्टेला माहीती देणे, मोबाईलवर एटीएम संबधात व बॅके संबधात येणारे फोन याबाबत संतर्क राहणे बाबत सुचना देण्यात आले. तसेच महिलानवर होणारे अत्याचार बाबत माहीती देण्यात आली. पोलीस स्टेशन जवाहरनगर अंतर्गत पिंपरी पुर्नवसन येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक बांन्ते व ३ कर्म यांनी गावातील अवैध धंदे सुरु असल्यास पोस्टेला माहीतीदेण. मोबाईलवर एटीएम संबधात व बॅके संबंधात येणारे फोन याबाबत संतर्क राहणे बाबत सुचना देण्यात आले. तसेच महिलावर होणारे अत्याचार बाबत माहीती देण्यात आली. पोलीस स्टेशन गोबरवाही अंतर्गत लवादे फिरते पोलीस स्टशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक म्हैसकर व २ कर्म यांनी गावातील उपस्थित नागरीकांना सायबर क्राईम, बाल लैगिंक अत्याचार बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. बॅकींग फसवणुक युवा पिडीला स्पर्धा परीक्षेची माहीती देण्यात आली. एटीएम कार्ड व बॅकेचे अकाऊन्ट नं. बद्दल फसवणुक बाबत तसेच बाल लैगिंक अत्याचार बाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस स्टेशन अडयाळ अंतर्गत खैरी/ तेलोता येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक गायकवाड व [illegible] कर्म यांनी गावातील जनतेला चोरी, दरोडा, यांचे वाढत असलेले प्रमाण कमी होण्याकरीता संतर्कता पाळणे. अंधश्रध्दा व जादुटोना अश्या गोष्टीवर विश्वास ठेवणे याबाबत मार्गदर्शन

करण्यात आले. पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत मलकाझरी येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पोलीस उपनरीक्षक आडे व ४ कर्म यांनी यांनी घरफोडी, चोरी होवु नये, बॅकींग फसवणुक दारुबंदी, ध्वनीप्रदुषण तसेच पुढे होणाऱ्या सण उत्सवा दरम्यान शांतता राखण्यास कळविले. पोलीस स्टेशन मोहाडी अंतर्गत विहीरगांव येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गावात असणारे अवैध धंदया विषयी माहिती देण्यात आली. बॅकेचे पासबुक व एटीएम कार्ड क्र. कोणत्याही अनोळखी व्यक्तीस सांगु नये, सर्व धर्मीयांचे सण उत्सव कार्यक्रमावेळी संयोजकांनी ध्वनी क्षेपणांचा परवाना घेणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले. गावात अंधश्रध्दा व जादुटोण्याला बळी पडू नये, गावात वाद निर्माण होत असेल अश्या व्यक्तीला समजावुन त्वरीत पोस्टेला घेवुन यावे बाबत मार्गदर्शन करण्यात आले. साकोली अंतर्गत वडेगाव येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दोन कर्मचा–यांनी मोबाईल व बॅके संबधात व एटीएम बाबत येणारे कॉल संबधात सावधांनी व सतर्क राहण्या बाबत मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन भंडारा अंतर्गत जाक येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दोन कर्मचा–यांनी उत्सवामध्ये शांतता राखणे डी.जे एटीएम मोबाईल बॅकींग महिलावर होणारे अत्याचार बाबत मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन गराडा येथे फिरते पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ३ कर्म यांनी गावातील छोटे तंटे, गावातच सोडविणे, प्रतिसाद ॲप्स, पोलीस मित्र ॲप्स, महिला विषयक कायदे घरफोडी, व चोरी होवु नये याबाबत बॅकींग फसवणुक दारुबंदी करणे इ. बाबत माहिती दिली.

एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा–या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिंल्हा वासीयांना केले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.